प्रेसनोट –

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दिं. १७/०७/२०१८

हौसेसाठी गावठी पिस्टल बाळगणा-या जनता वसाहत येथील युवकास दत्तवाडी पोलीसांनी केले जेरबंद

दिं.१६/०७/२०१८ रोजी दत्तवाडी पो. स्टे. कडील पो. ना. सुधीर घोटकुले यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "एक इसम त्याचे अंगात निळया रंगाची जीन्स पॅन्ट व पिवळया रंगाचा शर्ट घातलेला, गो-या रंगाचा व अंदाजे ५ फुट उंची असलेला असा संशयीतरित्या पर्वतीदर्शन येथील लक्ष्मीनारायण टॉकीजजवळील जय भवानी हॉटेलचे समोर थांबलेला असुन त्याचे डावे कमरेला बंदुकीसारखे काहीतरी खोसलेले असुन तो काहीतरी करण्याच्या इराद्यात येथे थांबलेला आहे." अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी ही वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे यांना कळवुन त्यांचे आदेशाने पोलीस उपनिरिक्षक डफळ यांनी स्टाफसह पर्वतीदर्शन येथील लक्ष्मीनारायण टॉकीजजवळील जय भवानी हॉटेल येथे जावुन थोडे आडबाजुस थांबुन पाहणी केली असता बातमीत मिळालेल्या वर्णनाचा इसम हा जय भवानी हॉटेलचे समोर थांबलेला दिसल्याने त्यास वरील स्टाफचे मदतीने पोउनि अनिल डफळ यांनी दिं १६/०७/२०१८ रोजी २२/३० वा. जागीच पकडले. तेव्हा त्यास त्याचे नावे पत्ते विचारता त्याने आपले नाव अभिषेक दिपक दिक्षीत, वय. २५ वर्षे, धंदा. काहीनाही, रा. गल्ली नं. ७७, जनता वसाहत पुणे असे सांगितलेनंतर त्याची झडती घेता त्याचे डावे कमरेला पॅन्टच्या आतमध्ये एक गावठी कट्टा कि.रू २५,०००/- व त्याचे पॅन्टचे डावे खिशात प्लॅस्टिकचे पाऊचमध्ये एक जिवंत काडतुस किंमत १००/- रुपये मिळून आले. असा एकुण २५,१००/-रू चा माल मिळून आला असुन त्याचेविरुध्द दत्तवाडी पो. स्टे. येथे गु. र. नं. २७२/२०१८ भारताचा हत्याराचा कायदा कलम ३(२५), मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला असुन सदरची कारवाई ही मा. ज्योतीप्रिया सिंह मा. पोलीस उप-आयुक्त सो परि-२ पुणे शहर, मा. डॉ शिवाजी पवार सहा. पोलीस आयुक्त सो स्वारगेट विभाग पुणे शहर, मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री देविदास घेवारे सो व पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा इंदलकर सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री अनिल डफळ, पो. हवा. तानाजी निकम, पो. हवा. रविंद्र फुलपगारे, पो. ना. सुधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पो शि रोहन खैरे, पो. शि. सागर सुतकर, पो. शि. विकास कदम, पो. शि. शिवाजी क्षीरसागर व पो. शि. राहुल ओलेकर यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक अनिल डफळ हे स्वतः करीत आहेत.